(SJIF) Impact Factor - 8.575

ISSN-2278-9308


# B.Aadhar


Peer-Reviewed & Refereed Indexed


Multidisciplinary International Research Journal

**October -2022**

ISSUE No - 372 (CCCLXXII)





Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Editor:
Dr.Dinesh W.Nichit
Principal
Sant Gadge Maharaj
Art's Comm,Sci Collage,
Walgaon.Dist. Amravati.

Executive Editor :
Dr.Sanjay J. Kothari
Head, Deptt. of Economics,
G.S.Tompe ArtsComm,Sci Collage
Chandur Bazar Dist. Amravati

**The Journal is indexed in:**

Scientific Journal Impact Factor (SJIF)

Cosmos Impact Factor (CIF)

International Impact Factor Services (IIFS)

B.Aadhar' Peer-Reviewed & Refereed Indexed Multidisciplinary International Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.575, Issue NO, 372 (CCCLXXII)
ISSN : 2278-9308
October, 2022

## INDEX


| No. | Title of the Paper / Authors' Name | Page No. |
|---|---|---|
| 1 | भारतीय समाज में महिलाओं की स्थिति:(वैदिक युग से मध्यकाल तक)— Dr. Archana Sisodia | 1 |
| 2 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा राज्य समाजवाद प्रा. डॉ. सुरेश एम. डोहणे | 11 |
| 3 | राष्ट्रवादी विचारवंत बिपिनचंद्र पाल यांच्या कार्याचा ऐतिहासिक मागोवा प्रा.डॉ. संजय जिभाऊ पाटील | 15 |
| 4 | भारतातील स्त्री आणि कायदे डॉ.कमल आर .पोटदुखे | 18 |
| 5 | गणेश शंकर विद्यार्थी यांचे शिक्षणविषयक विचार डॉ. संतोष म. घुगे | 21 |
| 6 | भारतीय स्वातंत्र्याची ७५ वर्ष क्रांतीवीर वि.दा. सावरकर : एक हिंदुत्ववादी नेता डॉ. स्मिता दि. जोशी | 24 |
| 7 | शेतकऱ्यांच्या आत्महत्या -- एक गंभीर समस्या प्रा..डॉ. लोमेश्वर रामचंद्र घागरे | 27 |
| 8 | स्वातंत्र्यानंतर कृषी क्षेत्रातील बदल डॉ. गजानन सोमकूवर | 29 |
| 9 | संत तुकारामांच्या अभंगांतील सामाजिकता प्रा. वंदना वसंत सोनवले | 33 |
| 10 | स्वामी विवेकानंद आणि त्यांचे शैक्षिणक कार्य् प्रा.डॉ. बोचरे जे. एम. | 36 |
| 11 | कृषी प्रक्रिया उद्योग आणि आर्थिक विकास (संदर्भ— विदर्भ ) प्रा. डॉ. आर.जी अंबाडकर | 39 |
| 12 | "माध्यमिक शाळेतील नियमित पुरुष शिक्षक आणि स्त्री शिक्षण सेविका यांची अध्यापन योग्यता व मानसिक आरोग्य यांचा तुलनात्मक अभ्यास" डॉ. महेंद्र म. श्यामकुल | 43 |
| 13 | महाराष्ट्रातील बालकामगारांच्या समस्या व उपाय डॉ. सुजाता रामदासजी नाईक | 47 |
| 14 | डॉ.बाबासाहेब आंबेड रांचे सामाजि , आर्थि , धार्मि , शै ाि ा , राज ीय विचार व ार्य अमोल पांडूर ा ाहिरे | 53 |
| 15 | गुरमती संगीताच्या विकासात संतांचे योगदान डॉ.सरिता इंगळे | 56 |
| 16 | Manifestation of Primitive Pantheism in Kamala Markandaya's Nectar in a sieve Dr.Krupal H.S. | 62 |
| 17 | E-Commerce Businesses -Legal Issues- Critical Analysis Dr. Mahendra L. Pachadkar | 65 |
| 18 | Language And Diction In Kamala Das' Poetry Asst. Prof. Parag Hedaoo | 67 |

**B.Aadhar'** Peer-Reviewed & Refereed Indexed Multidisciplinary International Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.575, Issue NO, 372 (CCCLXXII)
ISSN : 2278-9308
October, 2022


| | | |
|---|---|---|
| 40 | मराठीचे अध्ययन आणि अध्यापन प्रा. डॉ. गणेश न. चव्हाण | 163 |
| 41 | जागतिकीकरणातील सण उत्सव आर्थिक ताप यामुळे देशाच्या आर्थिक परिस्थितीला घसरण —एक विचार प्रा. डॉ. जयंत एम. बनसोड | 166 |
| 42 | १८ व्या शतकातील ब्रिटीश सरकारचे व्यापारविषयक धोरण प्रा. रमेश महादेवराव भगत | 171 |
| 43 | महात्मा गांधी यांच्या स्त्री सबलीकरण विचारांचे अध्ययन डॉ. नारायण पोहकर | 174 |
| 44 | भारतीय राजनीति में तीसरी दलीय शक्ति का उदय मनोज कुमार यादव | 179 |
| 45 | डॉ. आंबेडकरांचा सामाजिक न्याय आणि मूलभुत अधिकार प्रा. डॉ. दिपाली श्रीराम घोगरे | 182 |
| 46 | Global Impact on Education in Modern Society Dr. Prakash Neulkar | 185 |
| 47 | Riyaz Khair Aabadi Ek Munfarid Shayer Dr Feroz S Khan | 189 |

**B.Aadhar'** Peer-Reviewed & Refereed Indexed Multidisciplinary International Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.575, Issue NO, 372 (CCCLXXII)
ISSN : 2278-9308
October, 2022

# डॉ. आंबेडकरांचा सामाजिक न्याय आणि मूलभुत अधिकार

प्रा. डॉ. दिपाली श्रीराम घोगरे
डॉ.एच.एन.सिन्हा कला व वाणिज्य महाविद्यालय पातूर
Email – prodipalighogare@gmail.com

हजारो वर्ष अज्ञान, अन्याय, मानहानी व अत्याचार यांना बळी पडलेल्या अस्पृश्य बांधवाच्या मनात आत्मविश्वासाची भावना निमार्ण करून आपल्या हक्कासाठी संघटीतपणे लढा देण्यास त्यांना प्रवृत्त करणारे. भारतीय समाजात सामाजिक न्याय प्रस्तापित करण्यासाठी आपले जीवन सर्वस्व वेचनारे विसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील एक महान नेतृत्व म्हणजे डॉ. आंबेडकर. डॉ. आंबेडकर हे गाढे विदवान होते. समाजातील विषमते विरूध्द व पारंपारीक सामाजिक अन्यायाविरूध्द सातत्याने झगडणारे, दलितांच्या जीवनाला अर्थ प्राप्त करून देणारे झुंजार नेते व सामाजिक क्रांतीचे पूरस्कर्ते म्हणून डॉ. आंबेडकराचे मोठेपण निश्चितच वादातील आहे. समाजात सामाजिक न्याय प्रस्थापित करायचा असे तर राजकीय लोकशाहीचे रूपांतर सामाजिक लोकशाहीत झाले पाहिजे. समता, स्वातंत्र्य, बंधुता या तत्वावर आधारीत लोकशाहीतुन एक माणूस – एक मत व नव्हे तर एक माणूस – एक मुल्य हे तत्व खऱ्या अर्थाने समाजात बाणले पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. सामाजिक न्यायाच्या प्रस्थापणेसाठी ते आयुष्यभर झटत राहिलेत्र समता, स्वातंत्र्य व विश्वबंधूत्वावर आधारलेल्या जीवन मार्ग म्हणजे सामाजिक न्याय हा त्यांच्या दृष्टीत सामाजिक न्यायाचा अर्थ होता.

प्रत्येक व समाजघटकाला समान सामाजिक दर्जा व प्रतिष्ठा मिळेल, एका वर्गाकडून दुसऱ्या वर्गाचे हित डावलले जाणार नाही आणि प्रत्येकाला आपल्या राजकीय अधिकाराचा वापर करता येईल इतपत समज व क्षमता ज्या समाजात असेल तोच समाज सामाजिक लोकशाही व सामाजिक न्याय प्रस्थापणेसाठी उपयुक्त असतो. दलीत शोषित व पिडीतांना शिक्षण, प्रबोधन व प्रगतिचे मार्ग खुले झाल्याशिवाय न्याय अस्तित्वात येणार नाही असे डॉ. आंबेडकरांचे स्पष्ट मत होते म्हणून सामाजिक सुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टीने मानवतावादी मुल्य व अनेक वैधानिक तरतुदीचा समावेश त्यांनी भारतीय संविधारात केला आहे.

एक घटनातज्ञ एस. व्ही. पायली म्हणतात डॉ. आंबेडकरांनी आपली विद्वत्ता, कल्पनाशक्ती, तर्कनिष्ठा, कर्तृत्व आणि अनुभव पणाला लावला. जगातील सर्व सुधारलेल्या देशांच्या घटनात्मक कायद्याचे त्यांना प्रचंड ज्ञान होते. त्यातील अनेक चांगल्या गोष्टी त्यांनी भारतीय राज्यघटनेत घेतल्या मात्र त्यांचे आधुनिकीकरण केले नाही तर भारतातील परिस्थितीला अनुरूप अशा तरतुदींचा त्यांनी भारतीय राज्यघटनेत समावेश केलात्र

मात्र राज्यघटनेचा शब्द न् शब्द डॉ. आंबेडकरांचा आहे असा दावा करणे संयुक्तीक ठरणार नाही. किंबहुना लोकशाहीत ते शक्यही नाही. पण घटनेच्या सरनाम्यापासून शेवटच्या कलमापर्यंत डॉ. आंबेडकरांची छाप आहे. बुध्दी कौशल्य आहे. अविश्रांत परिश्रम आहेत. त्यांचे अनुभव आहेत. त्यांचे सामाजिक न्यायाविषयीचे विचार आणि त्यांनी घटनेत समाविष्ठ केलेले मुलभूत अधिकार ह्यांचा अभ्यास केल्यानंतर आपल्या निदर्शनास येते की, प्रत्येक मुलळूत अधिकाराचा अंतिम उद्देश समाजात न्याय वातावरण निर्माण करणे हाच आहे.

डॉ. आंबेडकरांच्या मते व्यक्ती विकास हेच आपले गृहीतकृत्य आहे आणि व्यक्ती विकासातील सर्वात मोठा अडथळा आहे. सामाजिक सत्तेची विषम विभागणी अर्थात व्यक्ती विकासासाठी तिला मुलभूत अधिकार प्राप्त करून देण्यासाठी सामाजिक अधिसत्तेचे समानीकरण करणे गरजेचे आहे आणि सामाजिक अधिसत्तेचे समानीकरण म्हणजेच डॉ. आंबेडकरांना अभिप्रेत असलेला सामाजिक न्याय आहे. डॉ. आंबेडकरांच्या मते हा सामाजिक न्याय समतेची प्रस्थापनाकरतो. समता ही व्यक्तीच्या विकासासाठी आवश्यक असणाऱ्या बाह्य परिस्थितीच्या उपलब्धतेत मोजायची असते. या मताच्या आधारावरच त्यांनी समाजातील सत्तेचे समानीकरण अर्थात सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी घटनेची कलम १४–१८ समतेच्या अधिकाराच्या

विवेचनात खर्ची केले. कारण समाजात जोपर्यंत सर्वांसाठी समान कायदा, सार्वजनिक ठिकाणी भेदभावास मनाई, समान संधी, अस्पृश्यता निवारण व पदव्या व किताबांनी समाप्ती होणार नाही हे डॉ. आंबेडकर जाणून होते.

सामान्य माणसावर डॉ. आंबेडकराचा एवढा लोभ आणि विश्वास होता की, त्यांच्या व्यक्तीगत व सामुहिक प्रतिष्ठेच्या प्रतिष्ठापणेसाठी त्यांनी लोकशाहीचा ध्यास धरला कारण लोकशाहीतच व्यक्तीला आपल्या मुलभूत अधिकाराचा उपयोग घेता येवू शकतो हे त्यांनी जाणले होते. डॉ. आंबेडकरांनी आयुष्यभर आपल्या लेखनीने व वाणीने जातीव्यवस्था व सामाजिक विषमतेवर कडाडून हल्ला केला. स्वातंत्र्य, समता व बंधूतेच्या तत्वावर हिंदू समाजाची पुर्नरचना त्यांना अभिप्रेत होती. आपल्या ग्रंथातून, सभांतून, परिषदांतून, मेळाव्यातून त्यांनी सामाजिक अन्यायाविरूध्दच्या जनजागरणाला गती दिली आणि जेव्हा भारतीय राज्यघटनेच्या मसुदा समितीची सुत्रे त्यांच्या हाती आली तेव्हा कायद्याच्या माध्यमातुन सामाजिक न्याय निर्माण करण्यासाठी सर्वात आधी त्यांनी मुलभूत अधिकारांची तरतूद केली.

शिवाय या तरतूदींना न्यायालयीन पाठबळ देण्याचाही पूरेपूर प्रयत्न डॉ. आंबेडकरांनी केला. १७ सप्टेंबर १९४९ रोजी घटना संसदेत बोलतांना ते म्हणाले होते. संसद घटनेच्या तिसऱ्या भागाव्यतिरिक्त कोणताही भाग बदलू शकते वा दुरूस्त करू शकते. घटनेच्या तिसऱ्या भागात मुलभूत अधिकार आहेत. अर्थात मुलभूत अधिकारांना त्यांनी किती महत्त्व दिले हेच इथे स्पष्ट होते. मुलभूत अधिकार राज्याकडून डावलले जावू नयेत म्हणून त्यांनी कम ३२ नुसार सामान्य नागरिकाला घटनात्मक उपाय योजनांचा अधिकार देवून त्यांचे मुलभूत अधिकार अबाधित केले. मात्र कायद्यापेक्षा अधिकारांना खरे संरक्षण प्राप्त होते ते समाजाच्या सामाजिक व नैतिक व सद्सद्विवेक बुध्दीमधूनच अशी डॉ. आंबेडकरांची खात्री होती. त्यांच्यामागे कायद्याने पुरस्कृत केलेले हक्क जेव्हा या सद्सद्विवेकाची मान्यता प्राप्त करतात तेव्हाच ते सुरक्षित व सुखरूप होतात. उलट जेव्हा मुलभूत हक्कांना समाजाचा विरोध असते. तेव्हा कोणताही कायदा संसद, न्यायव्यवस्था व संविधान त्या हक्कांना खरे संरक्षण देवू शकत नाही.

अशाप्रकारे प्रकांत विद्वान, गाढे व्यासंगी, विवेकानिष्ठ व बुध्दीप्रामाण्यवादी विचारवंत म्हणून डॉ. आंबेडकरांचा उल्लेख करावा लागतो. त्यांनी केलेला सामाजिक व आर्थिक लोकशाहीचा पुरस्कार, तसेच प्रत्येक व्यक्तीला व्यक्ती विकासाची परिस्थिती उपलब्ध असणे यालाच डॉ. आंबेडकर स्वातंत्र्य मानतात. कारण ज्या समाजाला धार्मिक, आर्थिक, राजकीय, सामाजिक किंवा इतर कोणत्याही क्षेत्रात कोणतेच अधिकार नव्हतेअशा समाजात डॉ. आंबेडकर जन्मले होते. म्हणून कदाचित तिरस्करणीय गुलामगिरी व अमाणूष अन्याय यांच्या गर्तेत पिचत पडलेल्या ज्या समाजात मी जन्माला आलो त्या समाजाची गुलामगिरी नष्ट करण्यात मी अपयशी उरले तर मी स्वत:ला गोळी घालुन घेईल. असे क्रांतीकारी उद्गार त्यांनी काढले होते. ह्याचाच परीणाम म्हणून राज्यघटनेत स्वातंत्र्याचा अधिकार धार्मिक अधिकार व शैक्षणिक व सांस्कृतिक अधिकार दिला.

अस्पृश्यांना इतरांच्या बरोबरीने सर्व हक्क मिळावेत व समाजातील विषमता नाहीसी व्हावी. सामाजिक न्याय प्रस्थापित व्हावा. एवढेच नव्हे तर अस्पृश्यांच्या अन्यायाकरीता त्यांना खास सवलती दिल्या जाव्यात असे त्यांचे ध्येय होते. या ध्येयपूर्तीसाठीच शिक्षणाची द्वारे खूली व्हावीत, समाजातील दुर्बल घटकांना सामाजिक न्याय मिळावा, केंद्रीय य राज्य शासनाच्या सेवते काही पदे तसेच तांत्रिक व वैद्यकिय महाविद्यालयात व अन्य उच्च शिक्षण देणाऱ्या विद्यालयात प्रवेश देतांना काही जागा त्यांच्या करीता राखीव असाव्यात ह्या तरतुदी त्यांनी मुलभूत अधिकारांतर्गत व घटनेतील इतर तरतुदीतून दिल्या.

स्त्रियांना समाजात समान दर्जा आणि चांगली वागणूक मिळावी तरच खऱ्या अर्थाने सामाजिक न्याय प्रस्थापित होईल असे त्यांचे मत होते. समाजाच्या सर्वांगिन विकसासाठी त्यांनी स्त्री शिक्षणावर भर दिला. स्त्रियांना शिक्षण प्राप्त झाल्यास कुटुंबाचा विकास होईल व कुटूंबाला नैतिक वळण लागेल असे ते म्हणत. बालविवाहास त्यांनी पूर्ण विरोध केला. स्त्रियांनी कपडा व दागदागिण्यापेक्षा आपल्या कलागुणांचा विकास करण्यावर भर द्यावा असे त्यांनी प्रतिपादन केले.

स्त्रियांसाठी त्यांनी आपले मतच मांडले नाही तर स्त्रियांना हक्काचा विशेष पाठपुरावा केला होता हे उल्लेखनीय आहे. हिंदू कोड बिल ही त्यांची ह्या संदर्भातील ठोस कामगिनीच म्हणावी लागेल. अस्पृश्य व पददलितांच्या मुक्तीसाठी केलेले प्रयत्न या गोष्टींना तोड नाही. महात्मा फुलेंच्या काळापासून सुरू झालेली पण स्वातंत्र्य चळवळीमुळे काहीशी मागे पडलेली सामाजिक सुधारणेची चळवळ अतिशय जोमाने पुढे नेण्याचे कार्य त्यांनी केले. सामाजिक न्याय निर्माण करण्यासाठी निव्वळ संघर्षाचा मार्ग न स्विकारता त्यांनी दलितांच्या शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक विकासाकडेही लक्ष दिले. त्यांचे हे कार्य संपूर्ण मानव समाजासाठीच प्रेरणादायी ठरणारे आहे.

**संदर्भसूची :—**

१) डॉ.शरणकुमार लिंबाळे — प्रज्ञासुर्य, दिलीपराज प्रकाशन, पुणे.
२) डॉ.कोठेकर शांता--आधुनिक भारताचा इतिहास—श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.
३) डॉ.भोळे भा.ल.-- भारतीय राजकीय विचारवंत—पिंपळापूरे प्रकाशन, नागपूर.
४) डॉ. देगावकर श.गो.—राजकीय विचारवंत — श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.
५) डॉ. प्रा. हाशम शेख, प्रा. पाटील अरविंद, प्रा. देशमुख कमलाकर— भारतीय आणि पाश्चिमात्य राजकीय विचारवंत—विश्व पब्लिशर अॅन्ड डिस्ट्रिब्युटर्स, नागपूर.